I J R S S I S, Issue (IX), Vol. (I), May 2023: 117-121
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 517X
Original Article

Reg. No. : MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATION www.ijrssis.in

# भारतीय शेती व्यवसायाच्या समस्या व उपाययोजना

**दिलीप भिमराव मेंढे**
''उच्च शिक्षण, संशोधन आणि विशेष अभ्यास संस्था'' डॉ. खत्री महाविद्यालय, तुकुम, चंद्रपूर
*Corresponding Author :- dilipmendhe05@gmail.com

Communicated : 16.01.2023 | Revision : 23.02.2023 Accepted : 21.03.2023 | Published : 30.05.2023

**सारांश :**

शेती हा भारतीय लोकांचा प्राचीन व्यवसाय आहे. भारताचे ६५ टक्के लोक अजुनही शेतीपूरक व्यवसायावर अवलंबुन आहे. नैसर्गीक साधनसामुग्री व कमी भांडवलावर हा व्यवसाय करता येतो परंतु स्वातंत्र्याच्या ७५ वर्षानंतर सुध्दा कृषिप्रधान आपल्या देशात शेती व्यवसायाच्या समस्यांचे निराकरण झालेले नाही. वाढते कर्ज कृषि उत्पादनाचा वाढता लागत खर्च उत्पादनाला मिळणारा अपर्याप्त हमीभाव आणि नैसर्गीक संकट, दुष्काळ, अतिवृष्टी, महापुर, किडरोगाचा प्रकोप इत्यादी कारणांमुळे शेतीव्यवसायाची स्थिती अत्यंत वाईट झालेली आहे. देशात विकासाच्या १२ पंचवार्षीक योजना राबवून सुध्दा शेती व्यवसायाला बळकटी व स्थिरता प्राप्त झाली नाही. अलाभकारी आणि अपुऱ्या शेती उत्पादनाच्या परतव्यामुळे छोटे शतकरी आणि शेतमजुर आपला शेती व्यवसाय सोडून अन्य क्षेत्रात रोजगार शोधत आहेत. त्यातच अनेक पुंजीपती कृषि उपयोगी जमीनी स्वस्त किंमतीला खरेदी करुन भुखंड विक्रीच्या व्यवसायातून भरपुर पैसा कमावत आहे. शेतकऱ्याच्या जमीन विक्रीच्या समस्येमुळे भविष्यात देशाच्या वाढत्या लोकसंख्येला अन्नधान्याचा तुटवडा पडण्याची भिती निर्माण झालेली आहे.

**मुख्यशब्द :** प्राचिन, नैसर्गीक, भांडवल, स्थिरता, कृषिप्रधान, पुंजीपती, परतावा, भुखंड.

**प्रस्तावना :**

भारत हा कृषिप्रधान देश आहे. भारतीयांच्या जिवनमान व प्रगती कृषिव्यवसायाचे महत्वाचे स्थान आहे. परंतु अजुनही शेती व्यवसायाकडे केवह उपजिवीकेचे साधन म्हणून आजही पाहील्या जात आहे. देशाच्या विविध भागात शेती उत्पादनाच्या शैलीत प्रत्यक्ष उत्पादनात बाजारपेठेतील उत्पादनाच्या दरामध्ये भिन्नता आढळते तसेच सिंचनाच्या सुविधा व हवामान यामध्ये सुध्दा असमानता आढळते, ज्या राज्यात मोठ्या प्रमाणात सिंचनाच्या सोयी उपलब्ध आहे तेथे एकाच हंगामात तिन–तिन पिके घेता येतात तर ज्या राज्यात सिंचनाच्या सुविधा नाहीत तेथील शेतकऱ्यांना निसर्गाच्या लहरीपणावर अवलंबुन रहावे लागते. यामुळे शेतीच्या उत्पादन क्षमतेत असमानता आढळते याशिवाय निसर्गाची अनिश्चितता, शेतीचे हंगामी स्वरुप, शेती उत्पादनाला मिळणारे अपर्याप्त हमीभाव, वाढती शेतमजुरी, शेतीचे पडणारे तुकडे, जमीनीची होणारी झिज, कृषिपुरक उद्योग वाढविण्याकडे सरकारचे दुर्लक्ष, शासनाचे शेतीविषयक उदासीन धोरण, शेतकऱ्यांची अज्ञानता, शेती व्यवसायातील परंपरागत तंत्रज्ञान, अपर्याप्त अर्थपुरवठा इत्यादी कारणांमुळे भारतीय शेती व्यवसायाला संकटाचा सामना करावा लागत आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेत, सकल घरेलु उत्पादनात इतर क्षेत्राप्रमाणे शेतीक्षेत्राचे महत्वाचे योगदान असलेल्या शेती व्यवसायाला नवजीवन देऊन पुर्नजिवीत करण्याचे आवाहन देशापुढे आहे. यासाठी शासनाला उच्च स्तरापासून जमीनी स्तरापर्यंत व्यापक व्युहरचना करण्याची गरज आहे. ही गरज पुर्ण झाल्यास भारतीय अर्थव्यवस्थेला निश्चीतच भरारी प्राप्त होईल व शेती व्यवसाय प्रगतीकडे वाटचाल करेल.

**संशोधनाचा उद्देश (Objective Research)**

प्रस्तुत संशोधचा उद्देश भारतीय शेती व्यवसायाच्या प्रमुख समस्या व त्यावरील संभाव्य उपायांचा शोध घेणे हा आहे.

**गृहितकृत्य (Hypothesi)**

भारतीय शेती व्यवसायासमोर अनेक समस्या असून त्याच्या निराकरणासाठी योग्य उपाययोजनांची गरज आहे.

**संशोधन पध्दती :—**

प्रस्तुत संशोधनातील महत्वाची माहिती जमविण्यासाठी व्दितीय स्त्रोताचा उपयोग करण्यात आला आहे भारतीय शेती व्यवसायात असलेल्या विविध समस्या पैकी प्रमुख समस्या खालील प्रमाणे आहे.

**नैसर्गीक समस्या :—**

भारतीय शेती मोठ्या प्रमाणात निसर्गावर अवलंबुन आहे. यामुळे भारतीय शेती व्यवसायाला अनेक समस्यांचा सामना करावा लागतो. कधी अतिवृष्टीमुळे नद्यांच्या महापुरात पिके वाहून जातात तर सतत पडणाऱ्या पावसामुळे पिके सडायला लागतात तर कधी अपुऱ्या पावसामुळे पिके जळून जातात. तसेच हवामानातील बदलामुळे पिकांवर पडणाऱ्या विविध रोगांमुळे पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते व शेती उत्पन्नामध्ये घट अतिवृष्टीमुळे नद्यांना पुर येतो पुरामुळे नदी काठाची सुपीक जमीनीतील माती वाहत जाते त्यामुळे जमीनीची सुपीकता कमी होते. देशात पावसामुळे होणाऱ्या शेतीमालाच्या नुकसानी पैकी ८० टक्के हानी नद्यांना येणाऱ्या पुराझमुळे होते. तर पुरामुळे हेक्टर ३२९० लाख हेक्ट क्षेत्रापैकी ४०० लाख हेक्ट क्षेत्र प्रभावीत होते व हजारो करोड रुपयांचे नुकसान होते.

**घटते शेती उत्पादन :—**

भारतीय शेती व्यवसाय हा पुरातन असून पुर्वापार शेती उत्पादन घेणे चालु आहे. त्यामुळे जमीनीची सुपीकता दिवसेंदिवस कमी होत आहे. सुपीकता कमी झाल्यामुळे उत्पादनात सुध्दा घट होते. शेतजमीनीची सुपीकता वाढविण्यासाठी रासायनीक तसेच सेंद्रीय देणे आवश्यक असते. परंतु शेतकऱ्याची कमकुवत आर्थिक स्थिती आणि कमी होत चाललेले पशुधनामुळे अपर्याप्त मिळणारे शेण खत यामुळे पुरेसे खत शेतीला देवु शेत नाही. तसेच अधीक उत्पादन वाढीसाठी योग्य बि—बियाणाची आवश्यकता असते, परंतु भारतीय शेतकरी प्रमाणीत बियाणे न घेता घरघुती किंवा गावातीलच सावकाराकडून घेतलेले बियाणे शेतात लावतो. हे बियाणे योग्य पध्दतीने न उगवल्यामुळे किंवा कमी प्रमाणात उगवल्यामुळे उत्पादनात घट होते. तसेच पिकावर पडणाऱ्या अनेक रोगांपासून पिकांचे रक्षण करण्यासाठी त्यावर जंतुनाशक व किटकनाशाकांची फवारणी करावी लागते बोंडअळी, कपाशीवर पडणारा लाल्या, तुरीवरील किड यासाठी योग्य वेळी व उचीत पध्दतीने फवारणी करावी लागते परंतु आर्थिक कारणाने शेतकरी वेळेवर हे करु शकत नाही याचा उत्पन्नावर परिणाम होतो त्याचप्रमाणे शेतीची मशागत याचा सुध्दा शेती उत्पन्नावर परिणाम होतो.

**सिंचन सुविधांचा अभाव :—**

भारतात लागवडीखालील क्षेत्र १४१० लाख हेक्टर असून त्यापैकी ६४७ लाख हेक्टर (४५:) क्षेत्रात सिंचनाची सुविधा आहे. तर महाराष्ट्रात केवळ १७ टक्के क्षेत्रात सिंचन सुविधा आहे. देशातील एकुण जिल्ह्यापैकी सिंचन सुविधा उपलब्ध असलेल्या ४४ जिल्ह्यातुन देशाच्या एकुण खाद्यानाच्या ५० टक्के खाद्यान उत्पादीत होते. देशात असमान सिंचनाच्या सुविधा आहे. राजस्थान सारख्या कमी पर्जन्यमान असलेल्या राज्यात अत्यंत कमी सिंचन सुविधा आहे. सिंचनाबाबत अशीच स्थिती देशाच्या अनेक भागात आहे. सिंचन सुविधा नसल्यामुळे या भागातील शेतकऱ्यांना पावसाच्या पाण्यावर हंगामात एकच पिक घेता येते. यामुळे शेती व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्याचे उत्पन्न कमी होते.

**कमी हमीभाव :—**

भारतात शेती असे क्षेत्र आहे, ज्यात कष्टकरी शेतकऱ्याला त्याच्या उत्नाचा भाव ठरविण्याचा अधिकार नाही, तर कृषि उत्पादनाचे मुल्य केंद्र सरकार ठरविते. कृषि उत्पादनाचे मुल्य ठरवितांना भिन्न—भिन्न हवामान, अलग अलग

राज्यात अलग अलग जमीनीची उत्पादक क्षमता, तसेच सिंचनाच्या सुविधा, इत्यादी कारणाने उत्पादन खर्च भिन्न राज्यात अलग अलग आहे. तसेच शेतकऱ्याच्या श्रमाचे मुल्य अत्यल्प धरल्या जाते, शेतकऱ्याला लागलेला परिवहन खर्च, शेतीत गुंतवलेले भांडवल व लागलेला कालावधी. शेती उत्पादनाचे मुल्य ठरवितांना या सर्व बाबींचा विचार केल्या जात नाही. तसेच शेतीमालाचे मुल्य ठरवितांना प्रत्यक्ष शेतकऱ्याशी किंवा शेतकऱ्याच्या विविध संघटनाचे मताला महत्व दिल्या जात नाही. इत्यादी बाबींसोबतच बऱ्याच गोष्टी विचारात घेतल्या जात नाही.

**मागील काही वर्षातील हमी भावातील असमानता :–**

| अ.क्र. | पीक | २०१७–१८ | | २०१८–१९ | | २०१९–२० | | २०२०–२१ | | २०२१–२२ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मुल्य | वाढ | मुल्य | वाढ | मुल्य | वाढ | मुल्य | वाढ | मुल्य | वाढ |
| १ | धान | १५५० | ८० | १७५० | २०० | १८१५ | ६५ | १८६८ | ५३ | १९४० | ७२ |
| २ | कापुस | ४०२० | १६० | ५१५० | ११३० | ५२५५ | १०५ | ५५१५ | २६० | ५७२० | २११ |
| ३ | तुर | १४५० | ४०० | ५६७५ | २२५ | ५८०० | १२५ | ६००० | २०० | ६३०० | ३०० |
| ४ | सोयाबीन | ३०५० | २७५ | ३३९९ | ३४९ | ३११० | ३११ | ३८८० | १७० | ३९५० | ७० |
| ५ | ज्वारी | १७०० | ७५ | २४३० | ५३० | २५५० | १२० | २६२० | ७० | २७३८ | ११८ |
| ६ | उडद | ५४०० | ४०० | ५६०० | २०० | ५७०० | १०० | ६००० | ३०० | ६३०० | ३०० |
| ७ | मुंग | ५५७५ | ३५० | ६९७५ | ४०० | ७०५० | ७५ | ७१९६ | १४६ | ७२७५ | ७९ |
| ८ | भुईमुंग | ४४५० | २३० | ४८९० | ४४० | ५०९० | २०० | ५२७५ | १८५ | ५५५० | २७५ |

वरील तक्त्यात असे दिसते की धान, कापुस, तुर, सोयाबीन, ज्वारी, उडद, मुग, भुईमुंग हमी २०१७–१८ ते २०१८–१९ ची भाववाढ २००, ११३०, २२५, ३४९, ७३०, २००, ४००, ४४० तर आर्थिक वर्ष २०१८–१९ ते २०१९–२० ला ६५, १०५, १२५, ३११, १२०, १००, ७५, २०० रुपयेची वाढ झाली व आर्थिक वर्ष २०१९–२० ते २०२०–२१ ला ५३, २६०, २००, १७०, ७०, ३००, १४६, १८५ रु. वाढली तर आर्थिक वर्ष २०२०–२१ ते २०२१–२२ ला ७२, २११, ३००, ७०, ११८, ३००, ७९, २७५ रु. भाववाढ मिळाली आहे वरील विश्लेषणावरुन असे दिसते की वर्ष २०१७–१८ ते २०१८–१९ ला जो हमीभाव मिळाला त्यामध्ये २०१८–१९ ते २०१९–२० व २०१९–२० ते २०२०–२१ तसेच २०२०–२१ ते २०२१–२२ मिळालेल्या हमीभावात घट झालेली आहे भारतीय शेतीच्या अन्य समस्या खालीलप्रमाणे आहेत.

**पायाभुत सुविधांची कमी :–**

भारतीय शेती ग्रामीण भागात केली जाते. ग्रामीण भागात रस्ते, विज, पाणी इत्यादींची कमतरता असते आणि ग्रामीण शेतकरी आर्थिकदृष्ट्या कमजोर असतो. रस्त्या अभावी शेतीमाल बाजारापर्यंत पोहोचण्यास बाधा येते तसेच वाहतुकीचे पुरेसे साधन उपलब्ध नसल्यामुळे व मालाच्या

वाहतुकीचा खर्च परवडणारा नसतो यामुळे शेतकरी आपला माल गावातीलच सावकाराला कमी किंमतीमध्ये देतो.

**शासनाचे शेती व शेतीला पुरक नसणारे धोरण :—**

भारत जरी कृषिप्रधान देश असला तरी शासन प्रशासनाचे निर्णय हे कृषि पुरक नाहीत. दुष्काळ, अतिवृष्टी, गारपीट, पिकांवरील रोग इत्यादी नैसर्गीक कारणाने खर्चाइतकेही उत्पन्न शेती मालाच्या विक्रीतुन निघत नाही यामुळे शेतकरी नेहमी आर्थिक टंचाई, दारिद्र्यात भरडला जातो. शेतकरी या दृष्टचक्रातुन बाहेरच निघत नाही. कारण आपली यंत्रणा शेती व शेतकऱ्याला पुरक नाही. उदा. विहीर खोदण्यासाठी जर एक लाख रुपये लागत असेल तर बॅक कर्ज ७०/८० हजार रुपये देते उरलेल्या रकमेकरीता शेतकऱ्याला पुन्हा खाजगी सावकाराच्या दारात जावे लागते. आणि शेतकऱ्याकडुन कर्ज माफीची मागणी होताच रिझर्व बॅंकेचे गर्व्हनर, स्टेट बॅंकसारख्या मोठ्या बॅंकेचे व्यवस्थापक कर्ज माफीला विरोध करतात आणि अर्थशास्त्राचे दाखले देतात. परंतु शेतकऱ्यांच्या आत्महत्या, उत्पादन खर्चापेक्षा कमी भावात शेतीमाल विक्री याबाबत मात्र हे अर्थतज्ञ बोलत नाही.

**भारतीय शेतीव्यवसायाच्या अन्य समस्या खालीलप्रमाणे आहेत :—**

- भारतात ही वडीलोपार्जीत संपत्ती समजत असल्यामुळे पिढी दर पिढी शेतीचे तुकडे पडल्याने भारतीय शेतकऱ्यांची जमीन धारकता अत्यंत कमी आहे.
- एकुण शेतीयोग्य जमीनीपैकी अर्ध्यापेक्षाही कमी शेतीला सिंचन सुविधा उपलब्ध असल्यामुळे हंगामात एकच पिक घेता येते.
- भारतीय शेतकरी परंपरागत तंत्रज्ञानाने शेती करत असल्यामुळे प्रति हेक्टरी उत्पादन इतर देशांच्या तुलनेत कमी आहे.
- शेतीमाल प्रक्रीया केंद्र आणि साठवणुक केंद्राचा अभाव.

**निष्कर्ष :—**

भारतीय अर्थव्यवस्थेचा प्रमुख स्तंभ असलेलया शेती क्षेत्राचा जास्तीत जास्त विकास व्हावा आणि शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ व्हावी या करिता शेती समोर असलेल्या समस्या दुर करण्यासाठी केंद्र व राज्य शासनाला विविध विकास योजना राबविण्याची आवश्यकता आहे.

यातील काही संभाव्य योजना

- भारतीय शेती मोठ्या प्रमाणात निसर्गावर अवलंबुन आहे त्यामुळे निसर्गाच्या लहरीपणाचा फटका शेतकऱ्याला बसतो याकरिता शेती पिकाच्या नुकसान भरपाईसाठी प्रधानमंत्री पिक विमा योजनेच्या अंमलबजावणीकडे विशेष लक्ष देण्याची गरज आहे तसेच ही योजना शेतकऱ्यांच्या फायद्याची असली पाहीजे ना की विमा कंपन्याच्या फायद्याची.
- शेतीचे झालेले तुकडे जोडण्यासाठी चेकबंदी, गटबंदी सारख्या योजना राबवाव्यात तसेच गटशेती, समुह शेती, सहकार शेतीस प्रोत्साहन द्यावे.
- विजेची उपलब्धता नसलेल्या ठिकाणी सौर उर्जेचा सुलभ पर्याय सिंचनासाठी शेतकऱ्यांना उपलब्ध करुन द्यावा.
- उपलब्ध नैसर्गीक स्त्रोताचे जतन करुन जास्तीत जास्त शेतीला सिंचन सुविधा उपलब्ध करुन द्यावी. जुन्हा विहीरी, छोटे तलाव, पाझर तलाव यांना पुर्नजिवीत करावे.
- शेतकऱ्यांना उत्तम प्रतीचे भेसळमुक्त बि—बियाणे उपलब्ध करुन द्यावे.
- उत्पादन वाढीसाठी शासनाने शेतकऱ्यांच्या शेती उत्पादनाचे प्रदर्शन भरवून त्यांना पुरस्कार देवून प्रेरीत करावे.

- शेतकऱ्यांच्या मुलांना शेतकी शाळा, कृषि महाविद्यालयात शेतीचे नवनविन तंत्रज्ञान, सुधारीत बि–बियाणे इत्यादींची माहिती द्यावी.
- शेती उत्पादनाचे दर ठरविण्यासाठी राज्यवार मंडळे गठीत करावी.

**संदर्भ :**

wwww.maharashtratimes.com
www.sudhakar.in
www.loksatta.com
www.farmer.gov.in>mspstatement
www.researchgate
डॉ. राहुल भगत, भारतीय शेती समस्या संशोधन लेख.